RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ८९(४)] शनिवार, जुलै ६, २०१९/आषाढ १५, शके १९४१ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २२१

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले

(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सार्वजनिक आरोग्य विभाग

१० वा माळा, जी. टी. रुग्णालय आवार, नवीन मंत्रालय,
मुंबई ४०० ००१, दिनांक ६ जुलै २०१९

अधिसूचना

**महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम.**

क्रमांक शुनोंअ-२०१८/९७६/प्र.क्र. ६०४/कु.क.—खालील मसुदा महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, १९७३ मध्ये सुधारणा करण्याबाबतचा असून महाराष्ट्र शासन महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी अधिनियम, १९४९ च्या कलम १६ चे उप-कलम (१) तसेच उप कलम (२) च्या खंड (बी) व खंड (डी) मध्ये प्रदान केलेल्या अधिकारानुसार करीत आहे. या अधिनियमाच्या कलम १६ च्या उप कलम (३) नुसार सर्व संबंधितांच्या माहितीसाठी शुश्रुषा नियम, २०१९ पूर्व प्रसिद्ध करत आहे.

२. या नियमांसंदर्भात जर काही हरकती किंवा सूचना असतील तर त्या प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, १० वा मजला, गोकुळ तेजपाल रुग्णालय संकुल इमारत, नवीन मंत्रालय, मुंबई-१ या पत्त्यावर वरील दिनांक ६ ऑगस्ट २०१९ पर्यंत प्राप्त झाल्यास विचारात घेतल्या जातील.

### नियम-मसुदा

(१) **लघु शीर्षक.**—सदर नियमांना महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी नियम, २०१९ (दुसरी सुधारणा) असे संबोधण्यात येईल.

(२) **महाराष्ट्र शुश्रुषागृह नोदंणी नियम, १९७३** मधील नियम ३ मध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत. (यापुढे या नियमाला मुख्य नियम म्हटले जाईल.)

(३) **नोंदवही.**—स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकारी इलेक्ट्रॉनिक व हस्तलिखित स्वरुपात कलम-५ अनुसार शुश्रुषागृह नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या नोंदीकृत व्यक्तींच्या नावांची नोंदणी फॉर्म "ए" मधील प्रमाणे नोंदवही जतन करेल.



Scanned by CamScanner

(४) **मुख्य नियमाच्या नियम** (५) मध्ये फॉर्म 'सी' या शब्दानंतर पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

"स्थानिक पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनी अधिनियमानुसार दिलेली सर्व नोंदणीकृत प्रमाणपत्रे संबंधित महानगरपालिकेच्या/ नगरपालिके कटक मंडळाच्या (कॅटोन्मेट बोर्ड) आणि जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करेल.

(५) **मुख्य नियम** (६) च्या उप नियम (१) मध्ये पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे :—

(१) शुश्रुषागृह नोंदणीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर नियम (७) च्या उप नियम (२) मध्ये निर्धारित केलेल्या शुल्क त्या वर्षाच्या जानेवारी महिन्यात फॉर्म- बी मध्ये नोंदणीच्या नुतनीकरणासाठी आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहील.

(६) **मुख्य नियम** (७) मध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत :—

(अ) नोंदणी व नूतनीकरणासाठी शुश्रुषागृह (१ ते ५ खाटा) नोंदणी व नुतणीकरणासाठी पुढील प्रमाणे शुल्क आकारले जाईल.

| | | | रुपये |
|---|---|---|---|
| (१) | शुश्रुषागृह, महानगरपालिका (वर्ग अ) क्षेत्रात असल्यास | : | ५,०००. |
| (२) | शुश्रुषागृह महानगरपालिका (वर्ग ब) क्षेत्रात असल्यास | : | ४,५००. |
| (३) | शुश्रुषागृह महानगरपालिका (वर्ग क) क्षेत्रात असल्यास | : | ४,०००. |
| (४) | शुश्रुषागृह महानगरपालिका (वर्ग ड) क्षेत्रात असल्यास | : | ३,५००. |
| (५) | शुश्रुषागृह नगरपालिका क्षेत्रात, किंवा नगरपंचायत किंवा, ग्रामीण क्षेत्रात किंवा कटक मंडळात (कॅटोन्मेंट) क्षेत्रात असल्यास | : | ३,०००. |

(ब) शुश्रुषागृहाच्या प्रथम नोंदणीसाठी जेवढे शुल्क लागू असेल तेवढे शुल्क, नंतरच्या नुतणीकरणासाठी देखील लागू राहील.

(७) **मुख्य नियम** (११) नंतर पुढील भाग समाविष्ट करण्यात येत आहे :—

११(अ) **शुश्रुषागृह तपासणीसाठी प्राधिकृत अधिकारी.**— स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकारी (Local Supervising Authority शुश्रुषागृह तपासणीसाठी अधिनियमाच्या कलम-९ नुसार वैद्यकीय अधिकारी (गट-अ) रु. ५६१००-१७७५०० या वेतनश्रेणीपेक्षा कमी दज नसेल अशा अधिकाऱ्यास प्राधिकृत करेल व हा अधिकारी शुश्रुषागृहांची वर्षातून २ वेळा तपासणी करेल.

११ (ब) **तक्रार निवारण कक्ष.**— (१) स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकारी शुश्रुषागृहाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक स्वतं तक्रार निवारण कक्ष स्थापन करेल व या कक्षामध्ये टोल फ्री नंबर असलेल्या दुरध्वनीची व्यवस्था करेल.

(२) प्रत्येक शुश्रुषागृहाने स्थानिक पर्यवेक्षक अधिकारी यांचा व तक्रार निवारण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक शुश्रुषागृहात दर्शनी भागा प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.

११ (क) **शुश्रुषागृहाच्या रचनेतील बांधकामाबाबत.**— शुश्रुषागृहाच्या रचनेतील बांधकामात सोयी सुविधांमध्ये वाढ, किंवा बदल झाल्यास त्याची माहिती स्थानिक पर्यवेक्षक प्राधिका-यांना देणे आवश्यक राहील. तसेच करण्यात आलेल्या बदलांचा आराखडा (plan तयार करण्यात आल्यापासून एक महिन्याचे आत स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यास कळविणे आवश्यक राहील.

११ (ड) **कर्मचाऱ्यांचे प्रमाणक.**— (१) महाराष्ट्र वैद्यक परिषद अधिनियम, १९६५ (महा XLVI १९६५) किंवा भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६ (१०२/१९५६) किंवा महाराष्ट्र वैद्यकिय व्यवसायी अधिनियम, १९६१ (महा XXVIII १९६१) किंवा महाराष्ट्र होमिओपॅथिक व्यवसायी अधिनियम (XII १९६०) अन्वये नोंदणीकृत असलेला वैद्यकिय अधिकारी शुश्रुषागृहात २४ तास सेवा देण्यासाठी उपलब्ध असेल.

(२) १० खाटांच्या शुश्रुषागृहांसाठी किमान कर्मचारी वर्ग पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र (१) | कर्मचारी वर्ग (२) | प्रत्येक पाळीत आवश्यकता (३) |
|---|---|---|
| १ | कर्तव्यावरील वैद्यकिय अधिकारी (DMO). | प्रत्येक पाळीत १ |
| २ | अर्हताप्राप्त अधिपरिचारिका (सुतिकागृहासाठी) | प्रत्येक पाळीसाठी १० खाटांसाठी १ |
| ३ | अर्हताप्राप्त परिचारिका | १० खाटांसाठी ४ परिचारिका |

Scanned by CamScanner

११ (ई) **शुश्रुषागृहाची रचना व आराखडा.—** (१) सदरचे नियम अंमलात आल्यानंतर नोंदणी केलेल्या किंवा नुतनीकरण केलेल्या शुश्रुषागृहांना अनुसूचि - (*I*) मध्ये दिलेले प्रमाणक लागू राहील.

११ (एफ) **शुश्रुषागृहांना आवश्यक किमान साधनसामुग्री व यंत्रसामुग्री.—** (अ) नियमीत तथा आपत्कालीन प्रसंगात रुग्णांच्या जीवरक्षणासाठी प्रत्येक शुश्रुषागृहांकडे खालील उपकरणे असणे आवश्यक राहील.

(१) इमर्जन्सी औषधांचा ट्रे.

(२) १ सक्शन मशीन व १ फुट सक्शन मशीन (अतिरिक्त).

(३) ८ खाटांसाठी किमान १ ऑक्सिजन सिलेंडर व १ ऑक्सिजन सिलेंडर अतिरिक्त.

(४) ज्या विशेष सेवा उपलब्ध असतील त्यासाठी बंधनकारक सर्व आवश्यक यंत्रसामग्री.

(५) अग्निशामक उपकरणे.

(६) ड्रेसिंग ट्रॉली.

(ब) ३० खाटांपेक्षा जास्त खाटांच्या शुश्रुषागृहांमध्ये खालीलप्रमाणे ५ स्वतंत्र क्षेत्र (झोन) असावेत.

(१) प्रवेश कक्ष-(Reception).

(२) ॲम्ब्युलेटरी क्षेत्र.

(३) निदान कक्ष (OPD).

(४) आंतररुग्ण कक्ष (IPD).

(५) आणीबाणी क्षेत्र/(ऑपरेशन थिएटर, लेबर रुम इत्यादी).

११ (जी) **शस्त्रक्रिया गृहांसाठी किमान आवश्यक सुविधा.—** शुश्रुषांगृहातील शस्त्रक्रियागृहात पुढील सुविधा व उपकरणे असणे आवश्यक आहे.

(१) ऑपरेशन टेबल.

(२) ॲनास्थेशिया मशीन. (४ सिलेंडर सह).

(३) पल्स ऑक्सीमीटर.

(४) इलेक्ट्रीक सक्शन मशीन, जनरेटर कनेक्शनसह, व फुट सक्शन मशीन.

(५) इमर्जन्सी मेडिसीन ट्रे.

(६) शॅडोलेस लॅम्प (फिक्स किंवा मोबाईल).

(७) विशेष सेवासाठी आवश्यक यंत्रसामग्री व साधनसामग्री.

(८) ऑपरेशन थिएटर निर्जतुंकीकरणासाठी लागणारी साधनसामग्री.

११ (एच) **अतिदक्षता विभागासाठी किमान सुविधा.—**ज्या शुश्रुषागृहांमध्ये स्वतंत्र अतिदक्षता विभाग आहे तेथे खालील सुविधा व उपकरणे असावीत.

(१) प्रति खाट ७५ चौ. फुट जागा.

(२) सेंट्रल ऑक्सिजन सिस्टीम/किंवा प्रत्येक खाटेला स्वतंत्र ऑक्सिजन सिलेंडर व २ अतिरीक्त सिलेंडर.

(३) २ सक्शन मशीन्स व १ फूट सक्शन मशीन.

(४) प्रत्येक खाट पडद्याने विभाजीत असणे.

(५) खाटेजवळ इ.सी.जी, एस.पी ओ.टू (ऑक्सिजन ) व रक्तदाब मोजणी दर्शविणारा मॉनिटर.

(६) व्हेंटीलेटर (किमान प्रेशर सपोर्टवरील) व डिफीब्रीलेटर.

(७) ICU कक्षात १ एम.बी.बी. एस. डॉक्टर २४ तास तसेच फिजीशियन व सर्जनची सुविधा ऑन कॉल उपलब्ध असणे बंधनकारक आहे.



Scanned by CamScanner

११ (आय) **प्रसुतिगृह/सुतिकागृहासाठी किमान आवश्यक प्रमाणक.**—(१) आपत्कालीन प्रसंगी मूलभूत प्रसूती सेवा देणाऱ्या प्रसूतीगृहाकडे खालील सुविधा असणे आवश्यक आहे.

(१) Foetal Doppler फिटल डॉपलर.

(२) लेबर टेबल.

(३) नवजात बालक पुनरुज्जीवन संच.

(४) एक सक्शन मशीन जनरेटर कनेक्शनसह व एक फूट सक्शन मशीन.

(५) किमान १ ऑक्सिजन सिलेंडर ८ खाटांसाठी व १ अतिरीक्त सिलेंडर.

(६) किमान १ इनफंट वॉर्मर.

(७) Cardiopulmonary Resuscitation (CPR) साठी आवश्यक साधनसामग्री व यंत्रसामग्री.

(८) इमर्जन्सी ट्रे.

(९) ड्रेसिंग ट्रॉली.

(१०) ऑटोक्लेव्ह.

(११) अग्निशामक उपकरणे.

(२) ज्या प्रसुतिगृहामध्ये सर्वकष प्रसुतीच्या सेवा (Emergency Obstetric Comprehensive Services) दिल्या जातात तेथे उक्त उपकरणांसह सिझेरियन सेक्शन, फोरसेप , ventouse व रोधकारक आवश्यक उपकरणे असली पाहिजे.

११ (जे) **अतितात्काळ वैद्यकीय सेवा/आवश्यक सुविधा.**— (१) सर्व शुश्रुषागृहे, गंभीर रुग्णांना प्राधान्याने सेवा देईल. तत्कालिक सेवा देताना रुग्णांच्या आर्थिक क्षमतेचा विचार न करता तेथे उपलब्ध असलेल्या सुविधांच्या मर्यादेत रुग्णाला तात्काळ वैद्यकीय निकषानुसार जीवित रक्षणाचे उपचार देऊन नंतर रुग्णाला सुयोग्य अशा नजीकच्या रुग्णालयात संदर्भित करेल.

(२) प्रत्येक शुश्रुषागृहाकडे इर्मजन्सी बेसिक लाईफ सपोर्ट देण्यासाठी आवश्यक साधनसामग्री व प्रशिक्षीत वैद्यकीय व इतर कर्मचारी वर्ग असेल.

(३) आपत्ती काळात रुग्णांचे जीव वाचविण्यासाठी प्रत्येक शुश्रुषागृह त्यांच्याकडील सेवा व तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करेल.

११ (के) **प्रत्येक शुश्रुषागृह, आंतररुग्णांची फॉर्म 'डी' मध्ये नोंदवही ठेवेल.**

११ (एल) **रुग्णाचा मृतदेह नातेवाईकांकडे सूर्पूद करणे.**— शुश्रुषागृहात जर एखाद्या रुग्णाचा मृत्यू झाल्यास, योग्य ती न्यायवैद्यक प्रक्रिया पूर्ण करून रुग्णाचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत रुग्णालयाचे बील प्रलंबित आहे म्हणून अथवा अन्य कारणांसाठी मृतदेह रोखून ठेवला जाणार नाही.

११ (एम) **रुग्णाने शुल्क अदा केले नाही केवळ यास्तव त्यास रुग्णालय ताब्यात ठेवणार नाही.**

११ (एन) **रक्त संक्रमण सेवा.**— रुग्णांच्या रक्ताची गरज पूर्ण करण्यासाठी शुश्रुषागृह परवानाधारक रक्तपेढीशी संलग्न असेल. तसेच रक्त उपलब्ध करून देणे ही शुश्रूषागृहांची जबाबदारी राहील.

११ (ओ) **स्थानिक पर्यवेक्षक प्राधिका-याकडे विशिष्ठ रुग्णांची माहिती कळविणे.**— रोगांची सोबतच्या अनुसूची II मधील प्रकरणांची माहिती शुश्रुषागृहाकडे रोग निदान झाल्यास स्थानिक पर्यवेक्षक प्राधिकाऱ्यास देण्यात येईल.

११ (पी) **राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमासाठी सहकार्य करणे.**— कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे प्रत्येक शुश्रुषागृह राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमात सहभागी होईल तसेच स्थानिक पर्यवेक्षकीय प्राधिकारी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाची माहिती मागेल त्या त्या वेळेस प्रत्येक शुश्रुषागृह विहित नमुन्यातील माहिती पर्यवेक्षक प्राधिकारी यांना उपलब्ध करून देईल.

११ (क्यु) **रुग्ण हक्क संहिता.**— शुश्रुषागृहात दाखल झालेल्या रुग्णांना पुढीलप्रमाणे हक्क असतील.

(अ) रुग्णास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस अथवा जवळच्या नातेवाईकास रुग्णाच्या आजाराबाबतची माहिती, आजाराचे स्वरूप, आजाराचे कारण, करावयाचे उपचार, अपेक्षित परिणाम, गुंतागुंतीची शक्यता व उपचाराचा खर्च इत्यादी माहिती जाणून घेण्याचा हक्क राहील.

Scanned by CamScanner

(ब) स्त्री रुग्णाची तपासणी अन्य स्त्री अथवा स्त्री परिचारीकेच्या उपस्थितीत केली जाईल.

(क) एच.आय.व्ही./एड्स, झालेल्या व्यक्तीस उपचार मिळण्याचा हक्क राहील.

(ड) संबंधीत रुग्णाला शुश्रुषागृहाच्या स्वागत कक्षाजवळ ठेवलेल्या नोंदवहीत तक्रार नोंदविण्याचा अधिकार असेल.

(इ) शुश्रुषागृहातील विशेषज्ञांची यादी त्यांच्या शैक्षणिक अर्हतेसह शुश्रुषागृहाच्या स्वागत कक्षाजवळ ठळक दिसेल अशा ठिकाणी कायमस्वरूपी लावण्यात येईल.

(फ) दुसरे मत (Second-opinion) घेण्याचा हक्क रुग्णाला आहे. त्यासाठी लागणारे वैद्यकीय व प्रयोगशाळा इत्यादीचे अहवाल रुग्णांचे नातेवाईकास/रुग्णाला उपलब्ध करून देण्यात येतील.

(ग) रुग्णाला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस रुग्णांचे वैद्यकीय अहवाल मागण्याचा हक्क आहे. रुग्ण दाखल असताना आंतररुग्ण पत्रिकेची फोटोकॉपी रुग्णाला मागणीनुसार उपलब्ध करून दिली जाईल.

(ह) डिसचार्ज कार्ड प्रत्येक रुग्णाला सुट्टीनंतर दिले जाईल. त्यात रोगनिदान, त्याची लक्षणे, चाचण्यांचे अहवाल, दिलेले उपचार व डिसचार्जचे वेळी रुग्णाची स्थिती व पुढील सल्ला याचा उल्लेख असेल.

(आय) शुश्रुषागृह पुरविण्यात येणाऱ्या सर्व सेवांचे दरपत्रक मुख्य दर्शनी भागात ठळकपणे लावेल अथवा अनुसुची -३ च्या प्रपत्रात छापेल.

(८) मुख्य नियमाच्या फॉर्म क नंतर अनुसूची क्र. III समाविष्ट करण्यात येत आहे.

**रजिस्टर नमुना - ड**

या नमुन्यात शुश्रुषागृहाने आंतररुग्णांची माहितीसंकलित करावी.

| अ.क्र. | नाव | वय | लिंग | पत्ता | कोणी दाखल केले | संपर्क मोबाईल क्र. | तात्पुरते रोगनिदान | अंतिम रोग निदान | न्यायवैद्यक आहे/नाही | दाखल झाल्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | | | | | | |

**रुग्णाचा अंतिम परिणाम (Outcome)**

| पूर्ण बरा झाला डिसचार्ज दिनांक व वेळ | रिलिव्हड वा डिसचार्ज दिनांक व वेळ | संदर्भित केल्याचा दिनांक व वेळ | डॉक्टरी सल्ल्याविरुद्ध डिसचार्ज केल्याचा दिनांक | पळून गेला दिनांक व वेळ | मृत पावला दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
| | | | | | |

Scanned by CamScanner

## अनुसूची - I

(नियम ११ - ई पहा)

### शुश्रुषागृहासाठी किमान प्रमाणके

| अ.क्र (१) | विवरण (२) | क्षेत्रफळ (३) |
|---|---|---|
| १ | वॉर्डमध्ये प्रति रुग्ण क्षेत्र | किमान ६५ चौ. मीटर |
| २ | दोन खाटांमधील अंतर | ०६ फूट |
| ३ | दारांची किमान रुंदी | ०३ फूट |
| ४ | कठ्ठ्यांची उंची (डॅडो) | ३ फूट |
| ५ | स्नानगृह व टॉयलेटसाठी क्षेत्र | ३६ स्वे. फूट |
| ६ | स्वच्छतागृहांची संख्या स्नानगृहांची संख्या | प्रत्येक ८ खाटांसाठी एक स्वच्छतागृह. (स्पेशल रुम मधील स्वच्छतागृह वगळून) |
| ७ | वॉश बेसिन संख्या | प्रत्येक ८ खाटांसाठी १ |
| ८ | शस्त्रक्रियागृह असल्यास स्वच्छ झोन, न्युट्रल झोन | १०० चौ. फूट व १२० चौ. फूट अनुक्रमे |
| ९ | शस्त्रक्रियागृह असल्यास किमान शस्त्रक्रियागृह अथवा लघु शस्त्रक्रियागृह (निर्जंतुकीकरण क्षेत्र). | १४० चौ. फूट |
| १० | प्रसूती कक्ष असल्यास डिलीव्हरी टेबल, स्नानगृह व स्वच्छतागृह. | १४० चौ. फूट + ३० चौ. फूट |
| ११ | समुपदेशन कक्ष व तपासणी कक्ष | १४० चौ. फूट |
| १२ | मॅटर्निटी होम असेल तर इनफंट वॉर्मर रुम | १०० चौ. फूट (दोन–अर्भक वॉर्मर्ससाठी). |

सर्व आस्थापनांना अग्नि प्रतिबंधक यंत्रणा असणे अनिवार्य.

Scanned by CamScanner

## अनुसूची - II

### (नियम - ११ ई पहा)

### स्थानिक पर्यवेक्षक अधिकाऱ्यांकडे कळविण्याचे आजारांची यादी

(१) कॉलरा (पटकी)

(२) प्लेग

(३) घटसर्प

(४) नवजात बालकांचा धनुर्वात

(५) ॲक्युट फलॅसीड पॅरालेसीस

(६) जॅपनीज इन्सेफलायटीस

(७) डेंग्यू

(८) इनफेक्टीव्ह हिपॅटायटीस (कावीळ)

(९) गॅस्ट्रोइंटरायटीस

(१०) एच.आय.व्ही. तपासणी केलेली एकूण रुग्ण संख्या, त्यातील पॉझिटीव्ह रुग्णांची माहिती व गरोदर माता मासिक तपासणी माहिती.

(११) लेप्टोस्पारोसीस

(१२) ट्यूबरक्युलोसीस (फुप्फुसाचा क्षयरोग)

(१३) गोवर

(१४) मलेरिया

(१५) चिकनगुनिया

(१६) एकूण केलेले गर्भपात गर्भाच्या लिंगासह (जर १६ ते २० आठवड्यात गर्भपात असेल तर)

(१७) स्वाईन फ्ल्यू (एच १, एन १ इन्फ्लूएंझा).

Scanned by CamScanner

## अनुसूची - III

**(नियम ११- क्यू पहा )**

**शुश्रुषागृहामध्ये खालील सेवांचे दर प्रदर्शित करावयाचे त्याची यादी**

(१) ॲडमिशन फी

(२) प्रतिदिन आंतर रुग्ण खाट भाडे

(३) प्रति व्हीजीट डॉक्टर फीस

(४) सहयोगी डॉक्टर शुल्क

(५) भुलतज्ज्ञ शुल्क

(६) ऑपरेशन थिएटर शुल्क

(७) ऑपरेशन थिएटर असिस्टंट शुल्क

(८) ॲनास्थेशिया असिस्टंट शुल्क (प्रति व्हीजीट)

(९) नर्सिंग शुल्क (प्रति दिन)

(१०) सलाईन व ब्लड ट्रान्सफ्युजन शुल्क

(११) व्हीजीट शुल्क

(१२) स्पेशल व्हीजीट शुल्क

(१३) मॉनिटर शुल्क

(१४) पॅथॉलॉजी शुल्क

(१५) ऑक्सिजन शुल्क

(१६) पल्स ऑक्सिमिटर शुल्क

(१७) रेडिओलॉजी व सोनोग्राफी शुल्क.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वर्षा मु. भरोसे,**

शासनाचे उप सचिव.

Scanned by CamScanner